NATIONAL HEALTH MISSION
राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन

# रायगड जिल्हा परिषद,अलिबाग
## आरोग्य विभाग

दूरध्वनी क्रमांक – 02141-222077 ई मेल – dhozpraigad@gmail .com

जावक क्रमांक - राजिप/आरोग्य/ आस्था 2 / 7450 /2026 दिनांक - 17/09/2026

**जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यांचे अधिपत्याखालील एमबीबीएस वैदयकिय अधिकारी मानधन तत्वावर भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात देण्यात येत आहे.**

## *जाहिरात*

- आदिवासी व दुर्गम क्षेत्रात काम करणा-या पात्र एमबीबीएस वैदयकिय अधिका-यांना रु.८०,०००/- व इतर क्षेत्रात काम करणा-या एमबीबीएस वैदयकिय अधिका-यांना रु.७५ ,०००/- इतके एकत्रित मानधन तसेच बीएएमएस वैदयकिय अधिका-यांना रु. ४०,०००/- असे एकुण एकत्रित मानधन मिळेल.
- मुलाखतीच्या दिनांकास रिक्त असलेली पदे समुपदेशनासाठी दर्शनिय भागावर दर्शविण्यात येतील.
- एमबीबीएस वैदयकिय वैदयकिय अधिका-यांची नेमणूक ११ महिन्यासाठी व बीएएमएस वैदयकिय अधिका-यांची नेमणूक 03 महिन्यासाठी राहील. तसेच कंत्राटी वैदयकिय अधिकारी हे नियमित कर्मचा-याप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यास पात्र असणार नाहीत.
- खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा कमाल ३८ वर्षे व आरक्षित प्रवर्गासाठी ४३ वर्षे पर्यंत राहील.
- वैद्यकिय अधिकारी यांनी महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, एमबीबीएस गुणपत्रिका (सर्व वर्षाच्या ) पदवी / पदविका गुणपत्रिका व प्रमाणपत्र, आंतरवासीता प्रमाणपत्र, जात व जात वैधता प्रमाणपत्र शाळा सोडल्याचा दाखला वयाचा पुरावा, आधार कार्ड ई. मुळ कागदपत्र व त्यांच्या छायांकित प्रतीचा एक संच व पासपोर्ट साईज फोटोसह उपस्थीत रहावे
- नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीने सर्वात कनिष्ठ वैद्यकिय अधि-यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.
- शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्याअनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन एनपीएम, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत. वैद्यकिय अधिका-यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगता येणार नाही . अथवा त्यासाठी न्यायालयात दाद मागता येणार नाही. अशा आशयाचे बंधपत्र रु. १०० स्टॅपपेपरवर घेण्यात येईल.
- पुर्ननियुक्ती देण्यांत येणा-या वैद्यकिय अधिका-यांना एक दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देण्यात येईल.
- सदर कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांना म.ना.से (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतुदी लागू राहतील.
- सदर कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची अगावू नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.
- ५८ वर्षे पूर्ण करुन सेवा निवृत्त झालेले वैद्यकिय अधिकारी, शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकिय अधिकारी, अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतुन काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकिय अधिकारी, कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकिय अधिकारी यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.
- मुलाखतीच्या दिवशी सकाळी 12 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद,अलिबाग येथे अर्ज करावेत. अर्जाचा विहीत नमुना कार्यालयात उपलब्ध करुन दिला जाईल. **मुलाखत दि. 21/09/2026 रोजी दुपारी ठिक 2.00 वाजता मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात घेण्यांत येईल.**
- उक्त दर्शविण्यांत आलेल्या अटी मध्ये बदल करण्याचे प्राधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

for
सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

Scanned with OKEN Scanner